# Tata Power's Club Enerji organises Awareness Rally on Energy Conservation in Mumbai

Publication: Punya Nagari
Edition: Mumbai
Page No: 1
Date: 15th December 2015
Headline: Students rally on Energy Conservation : Tata Power Club Enerji initiative



## ऊर्जा संवर्धनासाठी विद्यार्थ्यांची रॅली

टाटा पॉवर क्लब एनर्जीतर्फे उपक्रम

मुंबई : टाटा पॉवर या खाजगी वीज निर्मिती व वितरण कंपनीच्या माध्यमातून देशभरात क्लब एनर्जीच्या माध्यमातून मुंबईत रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये ९ शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ऊर्जा संवर्धनाची गरज लक्षात घेऊन भविष्याची पिढी असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची उभारणी करणे तसेच सामाजिक जनजागृती करणे यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांच्या गटाने विडंबन नाट्य व गाणी म्हणून शाळेच्या आवारातून रॅलीची सुरुवात केली. वीज वाचवा आणि झाडे वाचवा हा संदेश घराघरात पोहोचविण्यासाठी रॅलीमध्ये ९ शाळांमधील १३ ते १५ वयोगटातील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ऊर्जा संवर्धनावर जोरजोरात घोषणा देत सुमारे ४००० नागरिकांना जागृत केले. याबाबत टाटा पॉवरचे सीईओ व एमडी अनिल सरदाना यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत ऊर्जा संवर्धनाचा प्रसार करण्यासाठी मुलांनी दाखविलेल्या उत्साहाला दाद दिली. भांडुप येथील पवार पब्लिक स्कूलने संपूर्ण रॅलीचे नियोजन केले, त्यामध्ये ब्राईट स्कूल, गुरू नानक स्कूलच्या तीन शाखा, आयटीयूबीएस स्कूल, आरएयूबीएस स्कूल, सह्याद्री हायस्कूल, ऑक्सफर्ड हायस्कूल, एनईएस हायस्कूल आणि सेंट फ्रान्सिस झेवियर्स हायस्कूल या शाळांचे विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते. क्लब एनर्जीच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवीत १४ हजार २०० टन कार्बन उत्सर्जन रोखण्याच्या आणि सुमारे ६९४३ पेक्षा जास्त घरांना वर्षभर पुरेल इतक्या १४.२ दशलक्ष युनिट विजेची बचत करण्यात आली आहे.

Publication : Lokmat
Edition : Mumbai
Page No : 3
Date : 14th December 2015
Headline : Rally on Energy Conservation

# ऊर्जा संवर्धनासाठी जनजागृती

मुंबई : वीज वाचविण्याचे आवाहन करत विजेचे महत्त्व पटवून देण्यासाठी शहरात रविवारी वीज कंपन्यांच्या वतीने 'ऊर्जा संवधन दौड'चे आयोजन करण्यात आले होते. टाटा पॉवर आणि रिलायन्स एनर्जीकडून आयोजित दौडमध्ये तब्बल १ हजार ३०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

कांदिवली पूर्वेकडील लोखंडवाला संकुल येथे रिलायन्सच्या वतीने आयोजित दौडमध्ये एक हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. शिवाय पालकांनी यामध्ये सहभाग घेतला होता. पाच किलोमीटरच्या दौडमध्ये विद्यार्थी मित्रांनी मुंबईकरांना वीज वाजविण्याचे आवाहन केले. तर २.५ किलोमीटरच्या दौडमध्ये सहभाग घेत पालकांनीही मोहिमेला पाठबळ दर्शविले. टाटा पॉवरकडून आयोजित दौडमध्ये नऊ शाळांच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व विशद करीत घोषणा आणि पत्रकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यावर भर दिला. शाळा परिसरासह स्थानिक परिसरांमध्ये जनजागृती करीत मुंबईकरांना वीज वाचविण्याचे आवाहन विद्यार्थी मित्रांनी या माध्यमातून केले.




Publication : Loksatta
Edition : Mumbai
Page No : 6
Date : 12th Dec 2015
Headline : Tata Power Club Enerji : Rally on Energy Conservation

● टाटा पॉवर क्लब एनर्जी : ऊर्जा संवर्धन मोर्चा. भांडूपच्या पवार पब्लिक स्कूलपासून सुरुवात, स. ८

Publication : Navbharat
Edition : Mumbai
Page No : 2
Date : 12th Dec 2015
Headline : Tata Power : Rally on Energy Conservation

* टाटा पॉवर : ऊर्जा बचाओ रैली, स्थान : पॉवर पब्लिक स्कूल भांडुप, समय : सुबह 8 बजे.